# आय विटनेस धक्का न लागता काम होते आहे फत्ते



१ मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे कुलाबा - वांद्रे - सीप्झ या भुयारी मेट्रो ३ चे काम वेगाने सुरू असून, दक्षिण मुंबईतल्या पुरातन वारसा लाभलेल्या वास्तूंना हानी पोहचणार नाही; याची खबरदारी बाळगत हे काम फत्ते केले जात आहे.

२ विशेषत: कफ परेड ते हुत्तात्मा चौक परिसरात मोठ्या संख्येने पुरातन इमारती असून, भुयारी मेट्रोचे काम करताना या इमारतींना बाधा पोहचणार नाही यावर लक्ष देण्यात आले आहेत. आजघडीला हुतात्मा चौक स्थानकाचे काम ८२ टक्के झाले असून, येथील स्थानकांसह उर्वरित कामे करणे हे आव्हानात्मक असल्याचे कॉर्पोरेशनकडून सांगण्यात आले.

३ विशेषत: येथील कामे करताना कॉर्पोरेशनने पुरातन इमारतींच्या, जुन्या इमारतींच्या रहिवाशांसोबत संवाद साधत त्यांना विश्वासात घेत काम केले आहे. गिरगावातही कॉर्पोरेशनने हीच पद्धत वापरली असून, या प्रकल्पातील सीप्झ ते वांद्रे हा पहिला टप्प्यात नव्या वर्षाच्या सुरुवातीला सेवेत आणण्यासाठी वेगाने काम केले जात आहे.

(छाया : दत्ता खेडेकर)